# श्री शिवाजी शिक्षण 'संस्थागीत'

## 'हो तेजोमय अंबर हे !'

विद्येची हो जिथे साधना त्या विद्येचे मंदिर हे
कण कण इथला हो ज्योतिर्मय, हो तेजोमय अंबर हे !

निष्ठेचे हो जेथे पूजन
ओंकाराचे तिथेच दर्शन
सृजनाचा उद्‌घोष सांगतो...दीप अम्ही, तर भास्कर हे !

सकलांना या ज्ञान मिळू दे !
सकलांचा सन्मान फळू दे !
प्रगतीला ने शिखरावरती नव्यायुगाचे अक्षर हे !

एक महर्षी बीज पेरतो
समृद्धीचा मार्ग दावितो
त्या वृक्षाची फळे चाखती अवघे लोक निरंतर हे !

माणुसकी हा धर्म येथला
त्यासाठी हा जन्म घेतला
या जगण्याचे सार्थक व्हाया विश्व करू या सुंदर हे !

हो तेजोमय अंबर हे !

■ अरुण सांगोळे